शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० पासून आदित्य इन्स्टिट्युट ऑफ फार्मास्युटीकल या संस्थेत नवीन औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास शासन मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्र.टीईएम-२०१९/प्र.क्र.१८५/तांशि-४
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १ जुलै, २०१९.

<u>वाचा</u> :- १) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे क्र.वेस्टर्न/ १-४२५९२१७५९०/२०१९/ईओए, दि.३० एप्रिल, २०१९ चे पत्र.
२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक २/ एनजीसी /मान्यता/२०१९/५५४, दि. २१ मे, २०१९.
३) फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांचे क्र.पीसीआय-४०९३/२०१९-डी+बी/ २८३९-४१, दि.२१ जून, २०१९ चे पत्र.

<u>प्रस्तावना:</u>

उपरोक्त नमूद पत्रान्वये संचालक, तंत्रशिक्षण यांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्याकडून राज्यात औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० करीता प्राप्त मान्यतेच्या यादीनुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० पासून आदित्य इन्स्टिट्युट ऑफ फार्मास्युटीकल संस्थेत नवीन अभ्यासक्रमांसाठी शासन मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यास शासन मान्यता देण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय:

शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये सोबतच्या Annexure मध्ये दर्शविल्यानुसार आदित्य इन्स्टिट्युट ऑफ फार्मास्युटीकल संस्थेत नवीन औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

१) सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने तसेच फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेचे प्रवेश क्षमता Annexure मध्ये नमुद केल्याप्रमाणे राहील.

३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित

कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

९) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणेआवश्यक राहील.

१०) याशिवाय संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

२. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०७०११५५८४५७६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY AUDUMBAR DHARURKAR

Digitally signed by SANJAY AUDUMBAR DHARURKAR
DN: CN = SANJAY AUDUMBAR DHARURKAR, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPT
Date: 2019.07.04 12:05:06 +05'30'

(संजय औ.धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, ३०५, शासकीय तंत्रकिनेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, बांद्रा(पूर्व), मुंबई ४०००५१

३. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, औरंगाबाद (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
४. कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
५. संबंधित संस्था (संचालक,तंत्रशिक्षण यांच्यामार्फत)
६. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.
७. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.
८. फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया, कम्बाईन्ड काऊन्सिल बिल्डींग, कोटला रोड, ऐवान-ए-गालिब मार्ग, नवी दिल्ली -११०००२.
९. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई.
१०. कक्ष अधिकारी (तांशि-५), उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई.
११. निवड नस्ती/तांशि-४

Annexure

Higher and Technical Education Department, G.R. No.TEM-2019/C.R.185/TE-4, Dated: 1 July, 2019

Institute Code	Permanent Id	Institute Name	Institute Address	District	Institution Type	New Name of Institue	Program	University	Course Level	Name of Course	Shift	Full Time/Part Time	Intake Approved for 2018-19	Intake Approved for 2019-20 (AICTE)	Intake Variation 2019-20 (GOVT.)	Intake Variation
2555	1-2526287661	ADITYA COLLEGE OF ARCHITECTURE	SUY. NO. 123 SARDA ESTATE NALWANDI ROAD, BEED	BEED	Unaided - Private	ADITYA INSTITUTE OF PHARMACEUTICAL	PHARMACY	Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad	UNDER GRADUATE	PHARMACY	1st Shift	Full Time	0	100	100	100
								Maharashtra State Board of Technical Education, Mumbai	DIPLOMA	PHARMACY	1st Shift	Full Time	0	60	60	60